या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH

dainiklokaarambh@gmail.com

संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी
नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

94036 41482



# ३ पोलीस निलंबित, फास्टट्रॅक सुनावणी, IG आरती सिंग यांच्या अध्यक्षतेत SIT, बदलापूर घटनेप्रकरणी गृहमंत्री फडणवीस ॲक्शन मोडवर

## देवेंद्र फडणवीस यांचे ठाणे पोलीस आयुक्तांना आदेश

बदलापूरच्या घटनेत प्रारंभीच्या काळात कर्तव्यात कुचराई करणारे बदलापूर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक आणि हेडकॉन्स्टेबल यांना तत्काळ निलंबित करण्याचे सुद्धा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाणे पोलीस आयुक्तांना दुपारी आदेश दिले असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या घटनेचा गतीने तपास करुन खटला जलदगती न्यायालयात चालविण्यात येईल आणि विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.



बदलापूर येथे घडलेली घटना अतिशय दुर्दैवी असून, निंदनीय आणि मन हेलावून टाकणारी आहे. या प्रकरणात वरिष्ठ आयपीएस अधिकारी आरती सिंग यांच्या अध्यक्षतेत एसआयटी गठीत करण्याचे तसेच, कर्तव्यात कसूर करणाऱ्या तीन पोलिसांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या घटनेत जलदगती न्यायालयात खटला चालविण्यासाठी सुद्धा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश ठाणे पोलीस आयुक्तांना देण्यात आले आहेत. या खटल्यासाठी विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ उज्वल निकम यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नवी दिल्ली येथे ते माध्यमांशी बोलत होते.पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत आवश्यक ती कारवाई केली जात असून, फास्ट ट्रॅक कोर्टासाठी प्रस्ताव मागविण्यात आला आहे. संवेदनशीलतेने पोलीस परिस्थिती हाताळत आहेत. ही घटना उघडकीस आल्यावर तातडीने कारवाई करण्यात आली. तथापि कुठे काही विलंब असेल तर एसआयटी त्याची चौकशी करेल आणि त्यात दोषी आढळणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.अशा गंभीर घटनांमध्ये न्याय कसा मिळवून देता येईल, याचा प्रयत्न करायचा असतो. सध्या कायदा आणि सुव्यवस्था राखणे आणि त्या मुलींना न्याय देणे याला प्राधान्य आहे. आंदोलकांमध्ये कोण आहेत, यावर या घडीला चर्चा करण्यात अर्थ नाही, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.



## मनोज जरांगे पाटलांच्या गावात खा.बजरंग सोनावणेंची पेढे तुला माझ्या आयुष्यातील ही पहिलीच पेढे तुला:बजरंग सोनवणे

**बीड/प्रतिनिधी**

माझ्या आत्तापर्यंतच्या राजकीय कारकिर्दीत अनेक सत्कार सोहळे झाले. परंतू माझ्या आयुष्यातील हा पेढे तुला सत्कार पहिल्यांदाच होतो आहे. तुमचे प्रेम आणि माझ्यावर असलेला विश्वास, पाहून मी भराहून गेलो आहे. कारण मराठा आरक्षणाचे नेते, साक्षात मनोज जरांगे पाटील यांच्या जन्मगावी हा नवस आणि सत्कार होतो आहे.त्यामुळे आपण धन्य झालो आहोत. असे भावनिक उदगार खा. बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केले.

बीड लोकसभा निवडणूकीत, शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे खासदार व्हावेत. असा नवस मातोरी ग्रामस्थांनी केला होता. त्यांचा नवस पूर्ण झाला, त्यामुळे खा.बजरंग सोनावणे विजयी झाल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांच्या मूळ मातोरी गावात सोमवार(दि.19) खा. बजरंग सोनवणे यांची पेढे तुला करुन ग्रामस्थांना त्याचे वाटप करण्यात आले. त्यावेळी ग्रामस्थांचे ऋण व्यक्त करतांना खा. बजरंग सोनवणे बोलत होते.

पुढे बोलतांना खा.बजरंग सोनवणे म्हणाले की, बीड लोकसभा निवडणुकीत निवडून आल्यानंतर पेढे तुला करू असा नवस मातोरी येथील आसाराम जरांगे यांनी केला होता. हा नवस पूर्ण झाल्यानंतर आज श्रावणातील तिसऱ्या सोमवारी भालकेश्वर संस्थान महादेव मंदिरात पेढे तुला करण्यात आली.खरंतर आपल्या सर्वांची असलेली सोबत आणि विश्वास यामुळे आपण खासदार झालो. येणाऱ्या काळात सर्वांच्या प्रश्नांसाठी व जिल्ह्याचा विकास करण्यासाठी आपण केंद्रात आवाज उठवित राहणार आहोत. असा शब्द यावेळी खा.बजरंग सोनवणे यांनी मातोरी ग्रामस्थांना दिला. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित,मेहबूब शेख, पुजा मोरे , संपादक विजयकुमार वाव्हळ,......... यांच्यासह आदींची उपस्थिती होती.

## ई- पिक पाहणीची अट रद्द करून सरसकट अनुदान द्या - अभिजीत पवार

**बीड प्रतिनिधी**

ई- पिक पाहणी नसल्यामुळे सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकरी अनुदानापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ई - पिक पाहणी अट रद्द करून सरसकट अनुदान देण्याची मागणी शंभु सेना संघटनेचे महाराष्ट्र राज्य मीडिया प्रमुख अभिजीत पवार यांनी केली आहे. अनेक शेतकऱ्यांकडे मोबाईल नसल्यामुळे किंवा छोटा मोबाईल असल्यामुळे ई -पीक पाहणी करता आली नाही. अनेक शेतकऱ्यांना ई -पीक पाहणी ऑनलाईन कशी करायची याची माहिती सुद्धा देण्यात आली नाही. त्यामुळे महसुली गावातील शेतकरी या यादीत आले नसल्याबाबत शेतकऱ्यांना सरकारने ई पीक पहाणी अट रद्द करून सरसकट अनुदान मंजूर करावे. असे यावेळी प्रसिद्धी पत्रकाद्वारे अभिजीत पवार यांनी म्हटले आहे. खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन पिकाच्या अनुदानासाठी शासनाने ऑनलाईन ई पीक पेऱ्याची अट घातली आहे. परंतु शेतकरी त्यांच्या कापूस व सोयाबीन पिकांची ऑनलाइन



नोंदणी करू शकले नाहीत. सन २०२३ या हंगामात ई पीक पेरा नोंद केलेल्या शेतकऱ्यांनाच शासनाच्या अनुदानासाठी पात्र ठरविले जात असून, ऑनलाइन नोंदणी न केलेल्या शेतकऱ्यांना कापूस, सोयाबीन शेतात असताना सुद्धा शासनाच्या मदतीपासून वंचित ठेवले जात आहे. याबाबत सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सरसकट अनुदान देण्यात यावे, अशी मागणी यावेळी प्रसिद्धी पत्रकाद्वारे शंभू सेना संघटनेचे महाराष्ट्र राज्य मीडिया प्रमुख पवार यांनी दिला आहे.

## अतिवृष्टी नुकसानीचे पंचनामे तातडीने करा खा.बजरंग सोनवणे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**बीड प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यात गेल्या दोन दिवसापासून अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने नुकसानग्रस्त भागाचे तातडीने पंचनामे करुन शेतकऱ्यांना मदत द्यावी.आशा मागणीचे निवेदन खा.बजरंग सोनवणे यांनी बीड जिल्हाधिकारी यांना दिले आहे. बीड जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला असून पाटोदा तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील कांदा,उडीद,सोयाबीन पिकांबरोबर इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.परिणामी शेतकरी वर्ग अडचणीत सापडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करुन घ्यावेत. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ मदत मिळवून देण्याकरिता योग्य ती कारवाई करावी.अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली निवेदनातून आहे.



सदरील नुकसानीचे पंचनामे करत असताना एकही शेतकरी वगळून राहता कामा नये याची दक्षता घ्यावी. शेतकऱ्यांच्या नुकसानी संदर्भात आपण व्यक्तिशः लक्ष देऊन आहोत. त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी संबंधित यंत्रणेला तातडीने पंचनामे पूर्ण करून घेण्याच्या सूचना द्याव्यात.जेणेकरून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळणे शक्य होईल. पाटोदा तहसीलदार यांनी नुकसानीचे पंचनामे करत असताना विशेष लक्ष देऊन पंचनामे करून घ्यावेत. अशा सूचना खा. बजरंग सोनवणे यांनी जिल्हा प्रशासनाला निवेदनातून दिल्या आहेत.

# संभाजी ब्रिगेड लोकशाही जागर महामेळाव्यास नांदेड येथून शकडो कार्यकर्ते जाणार

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : संभाजी ब्रिगेडच्या वर्धापन दिनानिमित्त लोकशाली महामेळाव्यास नांदेड जिल्ह्यातून शकडो कार्यकर्ते जाणार असल्याची माहिती जिल्हाध्यक्ष सुभाषराव कोल्हे यांनी दिली.संभाजी ब्रिगेडच्या वर्धापनदिनानिमित्त २३ ऑगस्ट रोजी पुणे लोकशाही जागर मेळाव्याचे आयोजन केले आहे. बालगंधर्व पुणे येथे सकाळी १० वाजता मेळाव्याला सुरुवात होणार आहे. नांदेड येथून लोकशाही मेळाव्यासाठी शकडो कार्यकर्ते पुणे दाखल होणार आहेत. दरम्यान, राज्यातील राजकीय स्थिती, मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर संभाजी ब्रिगेडच्या या मेळाव्यात चर्चा आणि काही महत्वाच्या घोषणाही होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मेळाव्यात शिवसेना (उबाठा) गटाचे माजी मंत्री शिवसेना नेते सुभाष देसाई विरोधी




पक्षनेते आंबदास दानवे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड.मनोज आखरे महासचिव सौरभ खेडेकर,प्रवक्ते गंगाधर बनबरे मार्गदर्शन करणार आहेत. आरक्षण, शिक्षण, आरोग्य, नोकरभरती या महत्वाच्या मुद्द्यांबरोबरच शेतकरी, कामगार, महिला, विद्यार्थी, युवक-युवतींचे सक्षमीकरण या मुद्द्यांवरही चर्चा होणार आहे. त्याचबरोबर आगामी काळात राज्य सरकाराच्या धोरणाविरोधात संभाजी ब्रिगेडचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आहेत, त्या संदर्भातही या मेळाव्यात मार्गदर्शन केले जाणार असल्याची माहिती नांदेड संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे यांनी दिली. या मेळाव्याला नांदेड जिल्ह्यातुन ही शेकडो कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# राज्यातील शेतकरी बांधवांनी परळी वैजनाथ राज्यस्तरी कृषी महोत्सवास भेट दयावी

बीड, दि. 20 : बदलत्या परिस्थितीत शेतक-यांना उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देण्यास अनन्यसाधारण महत्व आहे.प्रयोगशील व प्रगतीशील शेतक-यांचे माध्यमातुन शेतक-यांना आपआपसातील विचारांची देवाणघेवाण करण्यास व्यासपीठ उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्यातील आत्मविश्वास वृध्दींगत होऊ शकतो. आधुनिक कृषि तंत्रज्ञानाचा शाश्वत पध्दतीने अवलंब केल्यास शेतकरी आर्थिक दृष्ट्या उन्नत होऊन जागतिक पातळीवरील स्पर्धाक्षम वातावरणात आपले स्थान सिध्द करु शकतील. याकरीता धनंजय मुंडे, मंत्री कृषी, महाराष्ट्र राज्य यांचे संकल्पनेतून व प्रमुख मार्गदर्शनाखाली दि.21 ऑगस्ट 2024 ते 25ऑगस्ट 2024 या कालावधीत मौजे परळी वै. जि. बीड येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटनप्रसंगी एकनाथ शिंदे (मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), शिवराजसिंहजी चौहान (मंत्री, कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार),देवेंद्र फडणवीस (उपमुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य) अजित पवार (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य), धनंजय मुंडे (मंत्री, कृषी, महाराष्ट्र राज्य तथा, पालकमंत्री बीड जिल्हा), संजय बनसोडे, (मंत्री, क्रीडा व युवक कल्याण बंदरे महाराष्ट्र राज्य) यांच्या शुभहस्ते होणार आहे. याशिवाय इतर संसद सदस्य, विधान परिषद सदस्य, विधानसभा सदस्य महोदय व विविध विभागाचे सन्माननीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

राज्यातील शेतकऱ्यांची शाश्वत प्रगती व्हावी, कृषि विषयक विकसीत तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहोचावे, शासकीय योजनांची माहिती शेतक-यापर्यंत पोहोचावी, शेतकरी ते ग्राहक थेट विक्री श्रृंखला विकसीत व्हावी व शेतमालाला चांगला बाजार भाव मिळावा तसेच शेतकरी व वरिष्ठ कृषी शास्त्रज्ञ यांच्यामध्ये थेट संवाद व्हावा म्हणून या प्रदर्शनात 400 पेक्षा जास्त दालने लावण्यात येणार आहेत. तसेच परिसंवाद, राज्यातील सर्व कृषी विद्यापीठाची दालने, विविध संशोधन केंद्र, कृषी विज्ञान केंद्र, प्रक्रिया उद्योग यांचे विशेष सादरीकरण होणार आहे. सदरील पाच दिवसाच्या कालावधीमध्ये पौष्टीक तृणधान्य महोत्सव, सेंद्रीय शेती दालन, खरेदीदार विक्रेता संमेलन, पशू प्रदर्शन,ड्रोन द्वारे फवारणी प्रात्यक्षिक, रानभाजी महोस्तव,धान्य व इतर शेतीमाल प्रदर्शन व विक्री, शेती निगडीत औजारे खरेदी विक्री दालन व कृषि उत्पादने, स्वयं सहाय्य महिला बचत गट निर्मित वस्तू /पदार्थ विक्री भव्य प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. महोत्सवात पाच लाखापेक्षा जास्त शेतकरी भेट देतील असे नियोजन करण्यात आलेले आहे.

मानवी आरोग्यामध्ये सकस अन्नाचे अनन्य साधारण महत्व आहे. सकस अन्नामध्ये विविध भाज्यांचा समावेश असतो. रानातील म्हणजेच जंगलातील तसेच शेतशिवारातील नैसर्गिकरित्या उगवल्या जाणाऱ्या रानभाज्या, फळभाज्या, कंदभाज्यांमध्ये विविध प्रकारचे शरिराला आवश्यक असणारे पौष्टीक अन्नघटक व औषधी गुणधर्म असतात. तसेच सदर रानभाज्या नैसर्गिकरित्या येत असल्यामुळे त्यावर रासायनिक किटकनाशक/बुरशीनाशक फवारणी करण्यात येत नाही. त्यामुळे पुर्णपणे नैसर्गिक असल्याने या संपत्तीचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. त्यांचे आरोग्य विषयक महत्व व माहिती जास्तीत जास्त ग्रामिण तसेच शहरी भागातील नागरिकांना होणेसाठी व विक्री व्यवस्था करुन रानभाज्यांच्या विक्रीतून शेतकऱ्यांनाही काही आर्थिक फायदा होणेसाठी लोकांमध्ये याबाबत जनजागृती करणेसाठी रानभाज्यांचे प्रदर्शन देखील या कृषी महोत्सवामध्ये आयोजित करण्यात आले आहे.

या महोत्सवात कृषी संलग्न विभागांचाही सक्रिय सहभाग असणार आहे.तरी राज्यातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी कृषी महोत्सवास भेट देऊन लाभ घेण्याचे आवाहन ,महाराष्ट्र राज्याचे कृषी मंत्री धनंजय मुंडे, यांनी राज्यातील शेतकरी बांधवाना केलेले आहे. रविंद्र बिनवडे भा प्र से (दिपाली कदम) (अश्विनी भोपळे) (अशोक किरनळ्ळी) आयुक्त, कृषि बी टी एम उपसंचालक आत्मा (सामेती) कृषि संचालक (आत्मा) महाराष्ट्र राज्य, पुणे हे उपस्थित राहणार आहे.

# अमृतच्या लक्षित गटातील युवकांना मिळणार MKCLसंस्थेमार्फत संगणक कौशल्य विकास प्रशिक्षणाची सुवर्ण संधी

**बीड : प्रतिनिधी**

बीड, दि. 20 : महाराष्ट्रातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील युवकांना कोणताही विभाग / संस्था अथवा महामंडळ यांचे मार्फत लाभ मिळत नाही, अशा युवकांना संगणक कौशल्या विकसित व प्रशिक्षित बनण्यासाठी आवश्यक कौशल्य, ज्ञान आणि पाठबळ देऊन त्यांना सक्षम करणे आणि उद्योगाभिमुख रोजगाराच्या आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून स्वावलंबनाला चालना देणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. त्या अनुषंगाने दि. 16 ऑगस्ट 2024 रोजी 'अमृत' आणि MK-CLयांच्यामध्ये महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला.

या करारा अंतर्गत MKCL मार्फत राबविण्यात येणाऱ्या काही निवडक प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना निवड झाल्यावर लाभ देण्यात येईल. 'अमृत' तर्फे प्रशिक्षणसाठी निवड झालेल्या युवकांना MKCL च्या नियमानुसार सुरुवातीस सुरक्षा शुल्क स्वतः भरावयाचे आहे. योजनेच्या पात्र लाभार्थीनी प्रशिक्षण पूर्ण केल्यावर त्या प्रशिक्षणाचे शैक्षणिक शुल्क अमृत संस्थेमार्फत MKCL संस्थेस परस्पर दिले जाईल. यासंबंधी सर्व माहिती अमृतच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येईल. या सामंजस्य कराराच्यावेळी MKCL च्या व्यवस्थापकीय संचालक श्रीमती वीणा कामत, संयुक्त व्यवस्थापकीय संचालक समिर पांडे, वरिष्ठ महाव्यवस्थापक अमित रानडे, उप महाव्यवस्थापक डॉ. पाटेकर आणि अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी, विशेष कार्यकारी अधिकारी उदय लोकापल्ली तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश वाघचौरे उपस्थित होते. अमृतच्या लक्षित गटातील जास्तीत जास्त तरुणांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले



स्वातंत्र्याच्या 78 वर्षानंतर पहिल्यांदाच धावली दगडी शाहाजनपूर करांच्या सेवेत लाल परी....! गावातील विद्यार्थी, युवक मुली जेष्ठ नागरिक ,महिलाच्या वतीने स्वागत करण्यात आले....!

## वृक्षांना राखी बांधून अनोखे रक्षाबंधन साजरे.



बीड तालुक्यातील आदर्श शिक्षण संस्था संचलित अंजनवती हायस्कूल येथे राखी पौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली .या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री शिरीष घरत होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेतील शिक्षक उपस्थित होते. सर्वप्रथम स्व. माजी खासदार केशरकाकू क्षीरसागर, लोकनेते स्व. सोनाजीराव नाना क्षीरसागर व विद्येची देवता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी राखी पौर्णिमेच्या निमित्त आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात शाळेचे मुख्याध्यापक श्री. शिरीष घरत यांनी राखी पौर्णिमा व त्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. अध्यक्ष समारोपानंतर शाळेतील सर्व विद्यार्थिनींनी सर्व विद्यार्थी व सर्व शिक्षक वृंद यांचे औक्षण करून राख्या बांधल्या. यानंतर शाळेतील विद्यार्थिनींनी तयार केलेल्या कागदाच्या राख्या या शाळेतील सर्व वृक्षांना बांधण्यात आल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीकृष्ण खोसे सर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन श्री वाघ सर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सहशिक्षक श्री मिटकरी सर, श्री येडे सर, श्री सर्वज्ञ सर, श्री लक्ष्मण बोराटे, श्री रोहन जगताप, आबा भड व सौ कांबळे मॅडम यांनी परिश्रम घेतले.

# जेष्ठ नागरीकांना तीर्थ दर्शन यात्रेची मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना मोफत संधीचा लाभ घ्यावा

**बीड (प्रतिनिधी)**

बीड, दि. 20 : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत जेष्ठ नागरीकांना तीर्थ दर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजन' सुरु करण्यात आली आहे. बीड जिल्हयातील वय वर्ष 60 किंवा त्याहून अधिक वयाचे आहेत त्यांना राज्य आणि भारतातील तीर्थक्षेत्रांना मोफत भेटीची दर्शनाची संधी देण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरु करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत राज्यामधील ज्येष्ठ नागरिकांसाठी तीर्थक्षेत्र यात्रा मोफत उपलब्ध करुन देणे, सदर योजनेंतर्गत निर्धारीत तीर्थ स्थळांपैकी एका स्थळाच्या यात्रेकरिता पात्र व्यक्तीला या योजनेचा एकवेळ लाभ घेता येईल तसेच प्रवास खर्चाची कमाल मर्यादा प्रती व्यक्ती रुपये 30.000/- (अक्षरी रुपये तीस हजार) फक्त इतकी राहील जेष्ठ नागरीकांनी योजनेचे माहिती प्राप्त करण्यासाठी व योजनेसंबधी अधिक माहितीसाठी डॉ. बाबासाहेव आंबेडकर, सामाजिक न्याय भवन बीड या कार्यालयाशी संपर्क साधावा व जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण बीड यांनी केले आहे.

योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे योजनेच्या लाभासाठी दि. ३१.०१०२०२४ पूर्वी ऑफलाईन अर्ज तदनंतर ऑनलाईन अर्ज,लाभार्थ्यांचे आधारकार्ड / रेशन कार्ड, महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र / महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला.लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्यांचे 15 वर्षाचे रेशनकार्ड तथा ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळख धरण्यात येईल),सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुंटूब प्रमुखाचा उत्पान्नाचा दाखला, (वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापर्यंत असणे अनिवार्य) किवा पिवळे / केशरी रेशनकार्ड,वैद्यकीय प्रमाणपत्र,पासपोर्ट आकाराचा फोटो, जवळच्या नातेवाईकाचा मोबाईल क्रमांक, सदर योजनेच्या अटी शर्तीचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र ही कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

# शेतकऱ्यांना ई पिक पाहणीजाचक अट रद्द करून सरसकट अनुदान द्यावे; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे:- डॉ.गणेश ढवळे

**बीड प्रतिनिधी):-**

बीड:- ( दि.२०) शेतकऱ्यांना राज्य सरकारच्या पिकविमा, पीक कर्ज, शासकीय अनुदान, पंतप्रधान सन्मान निधी, तसेच राज्य सरकारच्या नमो किसान योजना आदी विविध शेतींच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी " ई पिक पाहणी" ( इ.के.वाय.सी.) जाचक अट रद्द करण्यात यावी. ई पिक पाहणी करण्यासाठी शेतकऱ्यांकडे अन्ड्राईड मोबाईल नसणे, खेड्यापाड्यात मोबाईलला रेंज नसणे, नोंदणीचे संकेत स्थळ सुरळीत चालत नाही, वारंवार सर्व्हर डाऊन होणे, त्यामुळे नोंदणी प्रक्रिया पुर्ण न होणे आणि मुख्य म्हणजे शेतकऱ्यांना स्वतःच्या मोबाईलवर ई पिक पाहणी नोंद करणे जमत नाही. या विविध अडचणी असुन " ई पिक पाहणीच्या जाचक अटींमुळे सन २०२३ मधील खरीप हंगामातील निम्म्यापेक्षा जास्त कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकरी अनुदानास अपात्र ठरले आहेत तर काही ठिकाणी ई -पीक पाहणी करूनही सातबारावर नोंद होत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत त्यामुळे ई पिक पाहणी अट रद्द करून ७/१२ उताराप्रमाणे शेतकऱ्यांना सरसकट अनुदान देण्यात यावे या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.२०. मंगळवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी धरणे आंदोलन करण्यात आले.या आंदोलनात शेख युनुस,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, बाळासाहेब मोरे पाटील, प्रदेशाध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ती विचार मंच, प्रा. आण्णासाहेब मातकर जिल्हाध्यक्ष रासप,प्रा.बाळासाहेब सापनकर रासप तालुकाध्यक्ष बीड, पांडुरंग आंधळे, प्रदेशाध्यक्ष शिवशाहु ऊसतोड कामगार संघटना, आजिनाथ खेडकर,उप जिल्हाप्रमुख




शिवसेना , सोपान काका मोरे, तालुकाप्रमुख शिरूर (कासार) आदि सहभागी होते.जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव,महाराष्ट्र राज्य कृषी मंत्री तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांना निवेदन दिले. ई पिक पाहणीची जाचक अट रद्द करून सातबारावर उताराप्रमाणे शेतकऱ्यांना सरसकट अनुदान द्यावे. राज्य शासनाने सन २०२३ मधील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५००० रुपये प्रमाणे २ हेक्टर पर्यंत अर्थसहाय्य देण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आलेला आहे.मात्र ज्यांनी मागील वर्षी खरीप हंगामात ई पिक पाहणी केली आहे केवळ त्यांनाच ५ हजाराचे अर्थसहाय्य मिळणार आहे.बीड जिल्ह्यातील १० लाख ६९ हजार शेतकरी खातेदारांपैकी केवळ ४ लाख ९३ हजार शेतकऱ्यांनी ई पिक पाहणी केली आहे त्यामुळे ५ लाख ७५ हजार शेतकरी खातेदार या अनुदानापासून वंचित राहणार आहेत. ई पिक पाहणी करूनही सातबारावर नोंद होईना त्यामुळे शेतकरी अनुदानापासून वंचित

ई -पीक पाहणी करूनही सातबारावर नोंद होत नसल्याचा गंभीर प्रकार शिवरूद्र आकुसकर रा.आडस ता.केज जि.बीड येथील शेतकऱ्याच्या बाबतीत घडला असुन यांनी मागील १० दिवसांपूर्वी त्यांचे बंधू शिवशंकर बबनआप्पा आकुसकर यांची ई पीक पाहणी केली.परंतु त्याची अद्याप सातबारावर नोंद झाली नाही. त्यांनी याचा स्क्रीन व्हिडिओ पुरावा म्हणून सादर केलेला आहे.त्यामुळे गतवर्षी ई पीक पाहणी करूनही सातबारावर नोंद न झाल्याने २०२३ सोयाबीन, कापुस अनुदानापासून वंचित राहणार आहेत.तसेच यावर्षीही ई पीक पाहणी करून सातबारावर नोंद होत नसल्याने शेतकरी पिक विमा सह विविध योजनांपासुन पुढील वर्षीही वंचित राहणार आहेत.त्यामुळे ई पिक पाहणीची जाचक अट रद्द करून सरसकट अनुदान देण्यात यावे.

## ई पिक पाहणी करण्यासाठी शेतकऱ्यांना अडचणी

अनेक शेतकऱ्यांकडे अन्ड्राईड मोबाईल नाही.तसेच खेड्यापाड्यात मोबाईलला रेंज नसते, नोंदणीचे संकेत स्थळ सुरळीत चालत नाही,सर्व्हर डाऊनचा प्रश्न वारंवार निर्माण होतो त्यामुळे नोंदणी प्रक्रिया पूर्ण होत नाही.अनेक अशिक्षित शेतकऱ्यांना स्वतःच्या मोबाईल वर ई-पिक पाहणी नोंद करणे जमत नाही. वरील अडचणींमुळे ई पिक पाहणीची जाचक अट रद्द करून सरसकट अनुदान देण्यात यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

# केज राष्ट्रीय महामार्गावरील पथदिवे बंद असल्यामुळे इंडिका कार बसली डिव्हायडर वरती चढून; दिली पथदिव्याला जोराची धडक

**केज । सचिन भालेराव**

३५ हजाराच्या वर लोकसंख्या असलेले गजबजलेले आणि तेवढेच दिगबर मातब्बर पुढाऱ्यांचे शहर म्हणुन पंचक्रोशीत गाजलेले केज परंतु कोणताच पुढारी विकासाच्या दृष्टीने झटताना दिसत नाही वा विकासाला गवसणी घालण्याच्या दृष्टीने प्रयत्न करताना दिसत नाहीत. म्हणुनच केज शहरातील राष्ट्रीय महामार्गावरील पथदिवे मागील ६ वर्षापासून बंद आहेत. खा. रजनीताई पाटील



तसेच जनविकास परिवर्तन आघाडीचे हारुण इनामदार यांची केज नगरपंचायत वरती सत्ता आहे. केज शहरातील जनतेने विकास होईल या आशेने यांच्या उमेदवाराला निवडणून दिले खरे परंतु या निष्क्रीय नगरसेवकांनी आजपर्यंत विकासाचा " वा " सुद्धा केला नाही. या बाबत सविस्तर वृत्त असे कि दिनांक १९ ऑगस्ट रोजी केज शहराला सायं ७ वाजल्या पासुन पावसाने झोडपणे सुरु केले . पाऊस जोराचा सुरु होता ०८.३० ते ०९.३० च्या दरम्यान बीड कडून केजच्या दिशेन निघालेली टाटा इंडिका क्र. एम.एच १४ एफ.सी.०९७४ हि चारचाकी चालक घेऊन येत असता सिमा बियरबार च्या समोर राष्ट्रीय महामार्गावरील पथदिवे बंद असल्यामुळे तसेच रस्त्याच्या अंदाज आला नसल्यामुळे सरळ डिव्हायडर वरती चढुन पथदिव्याच्या असणाऱ्या पोलला जोराची धडकली असता चालक तथा अन्य दोघांना मुका मार अल्प प्रमाणात लागल्याने जास्तीची दुःखापत झाली नाही. मात्र या ठिकाणी पथदिव्याच्या संदर्भाने सदरील राष्ट्रीय महामार्गाचे काम करणारी एचपीएम कंपनी यांनी बसवलेले पथदिवे त्याची गुणवत्ता, केज नगरपंचायतचे सुस्त प्रशासन याच्यावरती तथा यांच्या कार्यावरती भ्रष्टाचाराचा तसेच निकृष्ट काम केल्याचा ठपका केज शहरातील जनतेने निर्विवादपणे ठेवलेला दिसत आहे.

# भारत बंद, बीड जिल्हा बंद ! मध्ये सहभागी व्हा- मनोज (नाना) मस्के

**बीड । प्रतिनिधी**

लढा अस्तित्वाचा बुधवार दि.२१ ऑगस्ट २०२४ संत महापुरुषांनी सामाजिक एकता निर्माण करण्यासाठी जनजागृती केली, महाप्रयासाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जाती तोडून विविध जातींचा प्रवर्ग निर्माण केला. त्याला संवैधानिक मान्यता प्रदान केली. त्यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींच्या लोकांमध्ये सामाजिक एकता निर्माण झाली.



अन्यायाविरुध्द लढण्याची कुवत निर्माण झाली. मात्र, इंग्रजाच्या फोडा आणि राज्य करा, या नितीप्रमाणे अनुसूचित जाती, जमातीमधील एकता तोडून या प्रवर्गामध्ये उपवर्ग निर्माण करण्याचा तथा सर्व प्रवर्गाला आरक्षण संपविण्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे अनुसूचित जाती, जमातीचे आरक्षण संपुष्टात येणार आहे. या निर्णयाविरोधात अनुसूचित जाती, जमातींमधील सर्व समाजाच्या वतीने बुधवार दि.२१ ऑगस्ट २०२४ रोजी सामुहिक बंद पुकारण्यात आला आहे. या बंदमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे. असे आव्हान एका पत्रकाद्वारे मनोज (नाना) मस्के यांनी केले आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज बीड दौऱ्यावर राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे करणार उद्घाटन



बीड । प्रतिनिधी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज बुधवारी (२१) बीड दौऱ्यावर आहेत. त्यांचा बीड जिल्हा दौरा खालील प्रमाणे मुख्यमंत्री दुपारी १ वाजून १५ मिनिटांनी रत्नागिरी विमानतळ येथून शासकीय विमानाने लातूरकडे प्रयाण करतील लातूर विमानतळावर दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी आगमन व हेलिकॉप्टरने परळी येथे येतील. दुपारी ३ वाजता स्व. पंडित अण्णा मुंडे सभामंडप, कृषी उत्पन्न बाजार समिती, कॉटन मार्केट यार्ड, नाथ रोड येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सव या कार्यक्रमासाठी उपस्थित राहतील. सायंकाळी ४ वाजून ३० मिनिटांनी हेलिकॉप्टर वरून लातूर विमानतळाकडे प्रयाण होणार असून सायंकाळी ५ वाजता लातूर विमानतळ येथे आगमन व शासकीय विमानाने मुंबई विमानतळाकडे प्रयाण.

# ३० वर्षे तुम्ही सांगितले ते काम केले आता मला तुमच्या आशीर्वादाची साथ द्या-बदामराव पंडित

## जातेगावला शिवसैनिकांचा मेळावा संपन्न

**गेवराई ।प्रतिनिधी**

गेल्या ३० वर्षापासून गेवराई तालुक्यातील जनतेच्या प्रत्येक कामासाठी मी खंबीरपणे उभा राहिलो. प्रत्येक गावाचे विकास काम आणि सामान्यांच्या वैयक्तिक अडीअडचणी सोडविण्यासोबतच, तुम्ही जी कामे मला सांगितली ती प्रामाणिकपणे मी केली आहेत. यापुढे अधिक गतीने विकास कामे करण्यासाठी आणि प्रत्येकाला स्वाभिमानाने जगता यावे यासाठी तुमच्या आशीर्वादाची मला साथ द्या असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केले आहे.

जातेगाव येथे दिनांक २० ऑगस्ट २०२४ रोजी आयोजित शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांचा मेळाव्यात माजी राज्यमंत्री बदामराव पंडित बोलत होते. याप्रसंगी जिल्हा परिषद चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, माजी जिप सभापती पंढरीनाथ लगड, अनिरुद्ध लोंढे, सरपंच मुकुंद बाबर, सरपंच बंडू पवार, जय भवानी



साखर कारखान्याचे माजी संचालक विनायक पवार, उपसरपंच रमेश चव्हाण, उपसरपंच अनिल माळी, उपसरपंच सुभाष पवार, अमरसिंह मस्के, गोविंदराव काळे, कैलास राठोड, बापूसाहेब जाधव, अंकुश धोंडरे, श्रीमंत डुकरे, सचिन पवार, पंडित जिजा आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना बदामराव पंडित म्हणाले की, माझ्याकडे काम घेऊन आलेल्याची जात-धर्म आपला-परका असा कधीही विचार न करता प्रत्येकाचे काम मी प्रामाणिकपणे केले आहे. प्रशासकीय इमारती, रस्ते, पाणीपुरवठा योजना, घरकुल योजना, विंधन विहीर, शेततळे, भव्य शाळा इमारत, शाळा खोल्या आदी सामूहिक कामासोबतच प्रत्येकाच्या जीवनातल्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मी तत्परतेने काम केले आहे. गेले दहा वर्ष मी आमदार नाही परंतु कोणाचीही कामे थांबू दिली नाहीत. पैशाच्या जीवावर आता कोणालाही आमदारकीचे स्वप्न पडू लागले आहेत. प्रत्येक निवडणुकीत मतदारांना आणि कार्यकर्त्यांना गाजर दाखवण्याचे काम विरोधक करतात आणि निवडणूक झाली की त्यांना वाऱ्यावर सोडतात याचा अनुभव तालुक्यातल्या जनतेने घेतलेला आहे. उसाचं राजकारण करणाऱ्यांनी उसातच शेतकऱ्यांना लुटून आपले घर भरले आहेत आणि तोच पैसा पुन्हा निवडणुकीत मतदारांना वाटणार आहेत. या पैशाला भुलू नका. विजयसिंह पंडित यांचे गेवराई तालुक्यासाठी काय योगदान आहे? सामान्य जनतेची त्यांनी कोणती कामे केली आहेत? गोरगरिबांच्या सुखदुःखाची त्यांना कोणती जाणीव आहे? असे गंभीर प्रश्न उपस्थित करून, गेल्या निवडणुकीत मी अपक्ष असताना 52 हजार मते घेतली होती. तेवढीच मते आता विजयसिंह पंडितांनी घेऊन दाखवावी असे आव्हान देऊन बदामराव पंडित म्हणाले की, गेले ३० वर्ष मी तुमची प्रामाणिकपणे सेवा केली आहे. आता मला तुमच्या आशीर्वादाची साथ द्या आणि विधानसभेला गेवराई विधानसभा मतदारसंघावर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली भगवा फडकवा असे आवाहन केले.

पंढरीनाथ लगड, अनिरुद्ध लोंढे, मुकुंद बाबर, बापूसाहेब जाधव, दत्ता राठोड आदींची समायोजित भाषणे झाली. कार्यक्रमास शिवाजीराव चव्हाण, बापू बद्रे, शेख अफसर, एकनाथ पवार, अभय पांढरे, भीमराव जाधव, बदाम पौळ, माऊली मुळूक, अविनाश चव्हाण, बाबासाहेब पांढरे, अभय चव्हाण, मारुती यमगर, महादेव चव्हाण, राजू नाडे, शेख नवीद आदींसह शिवसैनिक पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

बुधवार २१ ऑगस्ट २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

# बदलापुरात साडे ३ वर्षांच्या २ चिमुकलींसोबत काय घडलं? ही घटना कशी समोर आली?



**बीड । प्रतिनिधी**

साडे 3 वर्षांच्या 2 चिमुकलींवर अत्याचार झाल्यानंतर आदर्श विद्यालय, या शाळेची तोडफोड झाली. महिलांनीही शाळेच्या खिडक्यांच्या काचा फोडल्या. शाळेतल्या घटनेच्या विरोधात रोष व्यक्त केला. शाळेच्या प्रशासनावरही प्रकरण दाबल्याचा आरोप आहे. आधी ही घटना कशी उघडकीस आली, ते जाणून घ्या. 12 आणि 13 ऑगस्टला शाळेत 3 वर्षांच्या 2 चिमुकलींवर लैंगिक अत्याचार झाले. लघुशंकेसाठी जाताना सफाई कर्मचारी आरोपी 22 वर्षीय अक्षय शिंदेनं लैंगिक अत्याचार केले. सू सूच्या ठिकाणी दुखतंय असं सांगून लहानग्या मुलींनी शाळेत जाण्यास नकार दिला. पालकांनी ताल्काळ डॉक्टरांकडे धाव घेतली आणि मुलींची वैद्यकीय तपासणी केली. वैद्यकीय तपासणीत दोन्ही मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचं समोर आलं. त्यानंतर पालकांनी 16 ऑगस्टला पोलीस स्टेशनमध्ये धाव घेतली. पण पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करत 12 तास पालकांना वाट पाहावी लागली. हलगर्जीपणा करणाऱ्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक शुभदा शितोळे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आलीय. तर आदर्श विद्यालय ही शाळा भाजपच्या लोकांशी संबंधित असल्यानं गुन्हा नोंदवण्यात दिरंगाई झाली, असा आरोप उद्धव ठाकरेंनी केलाय. संस्था चालकांना कसं वाचवता?, असा सवाल सुप्रिया सुळेंनी केला. उद्धव ठाकरे आणि सुप्रिया सुळे राजकारण करत असल्याचं गृहमंत्री फडणवीस म्हणालेत. तर मंत्री गिरीश महाजनांनी गुन्हा नोंदवण्यात दिरंगाई करणाऱ्या पोलिसांवर कारवाई केल्याचं म्हटलंय. मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनीही ट्विट करुन संताप व्यक्त केलाय. बदलापूरच्या शाळेत लहान लहान मुलींच्या बाबतीत जो भयानक प्रकार घडला आहे तो धक्कादायक आणि संताप आणणारा आहे. मुळात या घटनेत गुन्हा दाखल करुन घेण्यातच पोलिसांनी 12 तास का लावले ?. एका बाजूला कायद्याचं राज्य म्हणायचं, आणि दुसऱ्या बाजूला पोलिसांच्याकडून झालेला हा कुठला हलगर्जीपणा?. माझ्या महाराष्ट्र सैनिकांनी हा मुद्दा लावून धरला आहे, आणि माझं महाराष्ट्र सैनिकांना सांगणं आहे की या प्रकरणात आरोपीला कठोरातील कठोर शिक्षा होईपर्यंत तुमचं लक्ष असू द्या.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज बीड दौ-यावर राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे करणार उद्घाटन

बीड, दि. 20: मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज बुधवारी (21) बीड दौऱ्यावर आहेत. त्यांचा बीड जिल्हा दौरा खालील प्रमाणे मुख्यमंत्री दुपारी 1 वाजून 15 मिनिटांनी रत्नागिरी विमानतळ येथून शासकीय विमानाने लातूरकडे प्रयाण करतील लातूर विमानतळावर दुपारी 2 वाजून 15 मिनिटांनी आगमन व हेलिकॉप्टरने परळी येथे येतील. दुपारी 3 वाजता स्व. पंडित अण्णा मुंडे सभामंडप, कृषी उत्पन्न बाजार समिती, कॉटन मार्केट यार्ड, नाथ रोड येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सव या कार्यक्रमासाठी उपस्थित राहतील. सायंकाळी 4 वाजून 30 मिनिटांनी हेलिकॉप्टर वरून लातूर विमानतळाकडे प्रयाण होणार असून सायंकाळी 5 वाजता लातूर विमानतळ येथे आगमन व शासकीय विमानाने मुंबई विमानतळाकडे प्रयाण.

## लाडक्या बहिणीची सुरक्षा वाऱ्यावर; अत्याचार करणाऱ्या नराधमाचे हातपाय तोडण्याचा कायदा करा-वर्षाताई जगदाळे

**बीड । प्रतिनिधी**

देशभरात महिला मुली असुरक्षित आहेत अत्याचार वाढले असून भयंकर प्रकार घडत आहे. फक्त बघ्याची भूमिका घेणे बंद करत सरकारने जशी लाडकी बहीण योजना प्रभावीपणे राबवली तशीच महिला मुलीवर अत्याचार करणाऱ्या नराधमाचे हातपाय तोडण्याचा कडक कायदा करावा भविष्यात असे प्रकार घडणार नाहीत असे प्रखर मत मनसेच्या महिला सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी व्यक्त केले आहे. पश्चिम बंगाल येथील कोलकत्ता



शहरात एका महिला डॉक्टर सोबत माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली. याचे पडसाद देशभरात उमटले आहे. यातच महाराष्ट्रात महिला, मुलीवर अत्याचाराच्या घटना वाढल्या आहेत. लहान मुली शाळेतच सुरक्षित नाही. बदलापूर येथे दोन लहान बालिकावर शाळेतच लैंगिक अत्याचार घडला. राज्यात एकीकडे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी शासन पाठ थोपटून घेत आहे. दुसरीकडे महिला , मुलींच्या सुरक्षितेचे काय? याकडे सरकार कधी लक्ष देणार. राज्यातील महिला व मुलींना आता खरी गरज सुरक्षेची आहे अत्याचार करणाऱ्या नराधमाचे हात पाय तोडण्याचा कायदाच करण्यात यावा जेणेकरून महिला व मुलीकडे कोणीही वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत करणार नसल्याचे स्पष्ट मत मनसे सेना महिला आघाडीच्या राज्य उपाध्यक्ष वर्षा जगदाळे यांनी व्यक्त केले आहे.

# राज्यस्तरीय मानवतावादी कविसंमेलनाचे आयोजन

**छ.संभाजीनगर।प्रतिनिधी**

जीवन प्रणाली प्रतिष्ठान महाराष्ट्र संचलित मनव प्रतिष्ठा सृजनता साहित्य परिषदेद्वारा साहित्य सम्राट आण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीनिमीत्त राज्यस्तरीय मानवतावादी कवि संमेलनाचे आयोजन दिनांक २५/०८/२०२४ रोजी महात्मा फुले स्भागृह डॉ. आंबेडकर लॉ कॉलेज नागसेनवन छ. संभाजीनगर येथे दुपारी १ ते ४ या वेळेत आयोजित केलेले आहे. कविसंमेलनाचे उद्घाटक धिमान प्रा. डॉ. धोंडोपंत मानवतकर सुप्रसिद्ध साहिबिक (मंठा) हे असून उद्घाटन सत्राचे अध्यक्ष धिमान भिमराव सरवदे, (उपाध्यक्ष-मा.प्र.सृ.सा.प. महा), सुत्रसंचालन प्रा. डॉ. चंद्रकांत साळवे (संघटक मा.प्र.सृ.सा.प. महा.), प्रस्ताविक धिमान प्रा. डॉ. कोंडबा हटकर (सहसचिव मा.प्र. सू.सा.प. महा.) हे करणार आहेत. राज्यस्तरीय मानवतावादी कवि संमेलनाचे अध्यक्ष धिमान राजू वाघमारे(सहसचिवमा.प्र.सृ.सा.प. महा.) हे राहणार असून सुत्रसंचालन धिमान प्रोफेसर डॉ. विठ्ठल स.जाधव (कोषाध्यक्ष मा.प्र.सृ.सा.प. महा.) तर आभार प्रदर्शन धिमान धन्यकुमार टिळक सर (सदस्य मा.प्र. सृ.सा.प. महा.) हे करणार आहेत. मानवातावादी कविसंमेलनात महाराष्ट्रातील नामवंत कविवये धिमान चंद्रकांत ब्डमोर (अंबेजोगाई), धिमान छगन घोडके (लातूर), धिमान संजीवजी कांबळे (बीड), धिमान आनंद चोपडे (बेळगाव), धिमान नामवंत प्रभे (अमरावती), धिमान योगिराज कोचाडे (हिंगणघाट वर्धा), धिमान देविलाल रैराळे (अमरावती), धिमान डॉ. नंदकिशोर दामोधरे (अमरावती), धिमान सिद्धार्थ प्रधान (पसणी), धिमान प्रा. आरुण कांबळे बनपुरीकर (सांगली), धिमान विद्याधर पांडे (अंबाजोगाई), धिमान सुभाष वाघमारे (वालचंद नगर), धिमान उत्तम कराळे (नाशिक), धिमान प्रा. डॉ. पांडुरंग सुतार (बीड), धिमान प्रताप मोरे (बीड), धिमती रंजना गायकवाड (अहमदपुर जि. लातूर), धिमान प्रा. देवानंद पवार (छत्रपती संभाजीनगर), धिमान सुजित कांबळे (सांगली), धिमान पंडित कांबळे (उस्मानाबाद), धिमान व्ही. एस. गायकवाड (उस्मानाबाद) धिमान प्रा. डॉ. शिवप्रसाद घोडके (लासूर स्टेशन, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर), धिमती सत्यशोधिका आम्रपाली पारवे (मुंबई) इत्यादी सहभागी होणार आहेत. तरी साहित्यिक व साहित्यरसिक बंधु भगिनींना विनंती करण्यात येते की, या मास्वतावादी कवि संमेलनामध्ये उपस्थित रहावे. असे निवेदन धिमान चंद्रप्रकाशजी शिंदे (अध्यक्ष म.पसृ.सा.प महा.) धिमान प्रा. शंकरराव चव्हाण (उपाध्यक्ष म.प्र. सृ.सा.प. महा.) धिमान मधुकर पवळे (सचिवम.प्र.सृ.सा.प महा.) सुरज साठे, धिमान प्रा. भारती फुलेकर, धिमान डॉ. जयश्री शिदे, धिमान डॉ. सुनिल गायकवाड, प्रा. डॉ. बाबासाहेव जावळे, धिमान सुभाष गवळी, इत्यादी राज्य सदस्य म.प्र.सृ.सा.प महा. यांनी केलेले आहे.

# सरकारने शंभर टक्के पिक विमा द्यावा ; शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करा

## – संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे ; उपजिल्हाधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन

**अंबाजोगाई (प्रतिनिधी**

सन २०२३ चार प्रधानमंत्री पिक विमा मंजूर करून तो सरसकट देण्यात यावा, शेतकऱ्यांचे सरसकट कर्ज माफ करा, ई-पिक पाहणी अट रद्द करा आणि सन २०२० चा पिक विमा द्यावा अशी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष प्रविण उत्तमराव ठोंबरे यांनी केली आहे. याबाबत संभाजी ब्रिगेडच्या वतीने उपजिल्हाधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. मागील अनेक महिन्यांपासून संभाजी ब्रिगेडने हा विषय लावून धरला आहे. पाठपुरावा सुरू ठेवला आहे. संभाजी ब्रिगेडच्या वतीने उपजिल्हाधिकारी यांना १६ ऑगस्ट रोजी तर तालुका कृषी अधिकारी यांना २० ऑगस्ट रोजी देण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, अंबाजोगाई तालुक्यात दुष्काळ पडला आहे. १४ जुलै नंतर रिमझिम पाऊस पडला. त्या पावसावर शेतकऱ्यांनी बळेच पेरणी केली. जुन ते सप्टेंबर महिन्यात अत्यंत कमी पाऊस पडल्यामुळे अंबाजोगाई तालुक्यात दुष्काळ पडला आहे. खरीप सन - २०२३ ऑक्टोबर महिन्यात सोयाबीन काढणी चालू होती. त्या दरम्यान मौजे पाटोदा (म.) येथे ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात काढणी पश्चात एका तासात ९० मिली पाऊस पडला. म्हणून शेतकऱ्यांच्या पिकांचे शंभर टक्के नुकसान झाले आहे. सोयाबीन शेतात उभे असताना कृषि अधिकारी यांनी शेतातील सोयाबीन काढले असा १५ ऑक्टोबर २०२३ रोजी चुकीचा रिपोर्ट दिला आहे. शेतकरी यांनी ७२ तासाच्या आत विमा कंपनीकडे ऑनलाईन तक्रार केली होती. परंतु, विमा कंपनीने आमच्या तक्रारीची साधी पाहणी ही केली नाही. तक्रारीचे काय झाले. याबाबत सूचना किंवा नोटीस दिली नाही. परंतु, अंबाजोगाई तालुक्यातील काही शेतकरी यांना पोस्ट हार्वेस्टचा पिक विमा मिळाला आहे. जे काही थोडा बहुत सोयाबीनला उतार आला आहे. ते शेतकऱ्यांचे सोयाबीन व्यापारी मातीमोल भावाने विकत घेत आहे. म्हणून यावर्षी शेतकरी यांची आर्थिक परिस्थिती खालावली, महाराष्ट्रात ४० तालुक्यात दुष्काळ पडला आहे. अंबाजोगाई तालुक्यात तीव्र दुष्काळ पडल्यामुळे शेतकरी यांना दुष्काळाचा काहीच फायदा झालेला नाही. त्यामुळे पुढील मागण्या करीत आहोत. त्या मागण्या अशा की, १) म्हणून शासनाने शेतकऱ्यांना १०० टक्के पिक विमा द्यावा., २) महाराष्ट्रातील शेतकरी यांचे सरसकट कर्ज माफ करावे., ३) सध्या सोयाबीन व कापूस या पिकांना हेक्टरी पाच रूपये अनुदान आले आहे. परंतु, ज्या शेतकऱ्यांनी ई-पिक पाहणी केली नाही. त्या शेतकऱ्यांचे नांव अनुदान यादीत नाही. तरी त्या शेतकऱ्यांकरिता शासनाने ई-पिक पाहणी अट रद्द करावी. तसेच ४) सन २०२० चा पिक विमा द्यावा. आमच्या या मागण्या लवकर नाही मान्य केल्या तर आम्ही दिनांक २४ ऑगस्ट २०२४ रोजी तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंबाजोगाई व तालुका विमा कंपनी कार्यालय समोर एका दिवसाचे लाक्षणिक उपोषण संभाजी ब्रिगेड तालुका अंबाजोगाई करणार आहे. तसेच मे.साहेब यांनी आमच्या अर्जाची योग्य चौकशी करून शेतकरी यांना योग्य न्याय द्यावा हि नम्र विनंती आहे. निवेदनावर संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे, संभाजी ब्रिगेड महिला आघाडी जिल्हाध्यक्षा अश्विनीताई यादव, तालुकाध्यक्षा सुनंदाताई लोखंडे, संभाजी ब्रिगेड जिल्हा सचिव नारायण मुळे, तालुकाध्यक्ष सिद्राम यादव, मराठा सेवा संघाचे मा.जिल्हाध्यक्ष रामकिसन मस्के आणि अण्णासाहेब देशमुख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. तर निवेदन देताना केशव टेहरे, लहू शिंदे, परमेश्वर मिसाळ यांच्यासह संभाजी ब्रिगेडच्या विविध आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सदरील निवेदनाच्या प्रती तालुका कृषि अधिकारी, तालुका विमा कंपनी कार्यालय, जिल्हा कृषि अधिक्षक कार्यालय आणि जिल्हा विमा कंपनी कार्यालय, बीड यांना देण्यात आल्या आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com